# अमरावती महानगरपालिका अमरावती
## सहायक संचालक नगर रचना

राजकमल चौक, अमरावती-४४४६०१ (दुरध्वनी क्र.०७२१-२५६१५६१)
Email :- commr.amtcorp@gmail.com


जा.क्र./अमनपा/ससंनर/अभि/९२८ /२०२३
दिनांक २९ /०३ /२०२३

प्रति,
**राजकुमार छगनलालजी अग्रवाल व इतर ३**
रा. अमरावती

**विषय :- मौजा- शेगांव, ता.जि. अमरावती येथील शेत सर्व्हे नं.१३/३/ब मधील क्षेत्र ०.३२ हे.आर जागेच्या अभिन्यास नकाशास रहिवासी वापराकरिता अंतीम मंजूरीची परवानगी मिळणेबाबत.**

**संदर्भ** :- आपला दिनांक २३/०१/२०२३ रोजीचा अर्ज.

विषयांकीत जागेच्या प्रस्तावित अभिन्यास नकाशास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अंतर्गत खालील अटींवर अभिन्यास नकाशास अंतीम मंजुरीची व अभिन्यासाखालील जागा निवासी वापराकरिता अकृषक मध्ये रुंपातरण करण्यासाठी खालील शर्ती व अटींवर मंजुर करण्यात येत आहे.

१) नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही भुखंडाचे भविष्यात विभाजन करता येणार नाही.
२) अभिन्यासातील खुली जागा सुविधा क्षेत्र इत्यादी करीता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतिरिक्त संपूर्ण निवासी अभिन्यासातील भुखंड फक्त निवासी वापराकरिताच अनुज्ञेय राहतील.
३) प्रस्तावित अभिन्यासाखालील जागेचे क्षेत्रफळ ०.३२ हे.आर. असुन ते ०.४० हे.आर. पेक्षा कमी असल्याने मंजुर UDCPR मधील नियम क्र ३.४.१(C) नुसार १०% रक्कम रु.२५,४५,४००/- चा दि.२९/०३/२०२३ रोजी भरणा अर्जदाराने केला आहे.
४) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत आवश्यक ते विकास शुल्क भरणा करुन मनपाची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.
५) विषयांकित जागेतून उच्च दाबाची विद्युत वाहीनी किंवा दुरध्वनी वाहीनी जात असल्यास ती रस्त्याच्या कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय भुखंडाची विक्री किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.
६) इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे.
७) अभिन्यासातील विक्री करण्यात आलेल्या प्रत्येक भुखंडाच्या विक्रीची माहिती (खरेदीखताची प्रत) या विभागात नोंदविणे आपल्याला बंधनकारक राहील.
८) अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन त्याचे जमिनीमध्ये पुर्नभरण करण्याच्या प्रकल्पाचे बांधकाम करणे महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार बंधनकारक राहील.
९) अर्जदार जमिनमालक/विकाराकर्त्यांनी सदर जागेतील वृक्षाचे संरक्षण करणे तसेच अभिन्यासाचे क्षेत्रफळानुसार प्रति हेक्टर्स २५ प्रमाणे झाडे लावुन ट्री गार्ड लावणे आवश्यक व बंधनकारक राहील.
१०) महाराष्ट्र जमीन महसुल नियम, १९६९ अंतर्गत जमिनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकरणीच्या नियम क्र.४ च्या अटींचे पालन करणे अर्जदार जमिनमालक/विकासकर्त्यांसह सर्व संबंधितांवर बंधनकारक आहे.
११) सदरची परवानगी आपल्या मालकीच्या जमीनीत नसलेल्या जागेचा विकास करण्यात पात्र नाही.

Scanned with OKEN Scanner

१२) प्रकरणात अर्जदार जमिनमालक/विकासकर्त्यांनी दाखल केलेल्या मोजणी नकाशात दर्शविलेल्या हद्दी ग्राहय धरुन मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे.जागेवरील सिमांकनामुळे जागेच्या लगतच्या जमिनधारकांचे हितसंबध बाधित होत असल्यास व त्याबाबत कोणतीही तक्रार वा न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास व अशा वादामध्ये तथ्य आढळल्यास सदरची शिफारस आपोआप रद्दबातल समजण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार जमिनमालक/ विकासकर्त्यांची राहील व तशा तक्रारीस वा न्यायालयीन वादास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१३) सदर परवानगी आपल्या मालकीच्या नसलेल्या जागेचा विकास करण्यास पात्र ठरणार नाही.

१४) सर्व संबंधीत विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

१५) प्रस्तुत प्रकरणी भुखंडाचे क्षेत्रावर जमिन विकास शुल्क रु.१,२६,८९१/- चा भरणा दि.२९/०३/२०२३ रोजी भरणा करण्यात आलेला आहे.

(मा.आयुक्त यांचे दि.२९/०३/२०२३ चे आदेशान्वये)

**सहपत्र : मंजूर अभिन्यास नकाशा २ प्रती.**

(घनश्याम वा.वाघाडे)
प्र.सहायक संचालक नगर रचना
महानगरपालिका,अमरावती.

**प्रतिलिपी. माहिती तथा पुढील कार्यवाहीकरीता**

१) उपविभागीय अधिकारी/तहसिलदार अमरावती यांना माहिती तथा अर्जदाराचे विषयांकित जागेवरील निवासी प्रयोजनार्थ सिमांकीत अभिन्यास नकाशा मंजुरी केल्यानुसार अकृषक रुपांतरण परवानगी देतांना वरील प्रमाणे अटी व शर्ती प्रस्तावित करुन अकृषक आदेशाची व मंजुर नकाशाची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

२) उप-अधिक्षक, भुमी अभिलेख, अमरावती

३) शहर अभियंता यांना मंजुर नकाशा व करारनाम्याच्या प्रतीसह प्राथमिक विकास कामांचे देखभाल/दुरुस्ती वरील नियंत्रणाकरीता तसेच मुदतीनंतर सुस्थितीत हस्तांतरणाचे कार्यवाहीस्तव.

४) उप-अभियंता विद्युत विभाग, महानगरपालिका अमरावती

सहपत्र : मंजुर सिमांकित नकाशाची प्रत.

स्वा/-
(घनश्याम वा.वाघाडे)
प्र.सहायक संचालक नगर रचना
महानगरपालिका,अमरावती.

Scanned with OKEN Scanner

# REVISED PROPOSED & DEMARCATED RESIDENTIAL LAYOUT PLAN IN S.NO 13/3-B pt, MOUJE :-SHEGAON , TAQ. & DIST. AMRAVATI




**Area Statement of Land**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | **Area of land of S. No 13/3-B pt. Shegaon** ( Minimum area of a, b, c be considered ) | | |
| | (a) As per ownership document (7/12 , CTS extract ) | 3200.00 | Sq.m. |
| | (b) As per measurement sheet | 3200.00 | Sq.m. |
| | (c) As per site | 3200.00 | Sq.m. |
| 2) | **Deductions for** | | |
| | (a) Proposed 30.00M. wide D.P. Road widening area | 600.00 | Sq.m. |
| | (b) Existing Road area | -- | Sq.m. |
| | (c) Natural water course area | -- | Sq.m. |
| 3) | **Gross Area of plot (1-2)** | 2600.00 | Sq.m. |
| 4) | **Recreational Open Space** | | |
| | (a) Required :- | -- | Sq.m. |
| | (b) Proposed :- | -- | Sq.m. |
| 5) | **Amenity plot no** | -- | |
| | (a) Required :- | -- | Sq.m. |
| | (b) Proposed :- | -- | Sq.m. |
| 6) | **Area under Electric Power Sub Station** | -- | Sq.m. |
| 7) | **Interal road area curve.** | 7.74 | Sq.m. |
| 8) | **Net area under layout plot no 1** | 2592.26 | Sq.m. |
| 9) | **Net area of plots for F.S.I. calculations (3-5b)** | -- | Sq.m. |
| 10) | **Permissible FIS factor for layout plots (9/8)** | -- | Sq.m. |
| 11) | Extra F.S.I. for Plot No 1 | 1200.00 | Sq.m. |

Approved & Sanctioned wide, Tahsildar Amravati Rev. Case No. NAF-2/Shegaon-503 2022-2023
Dated .... 29/03/2023

Tahsildar, Amravati.

Layout approved and Recommanded for non agriculture for Residential / Industrial / Commercial Purpose.

AMC अमरावती महानगरपालिका अमरावती

मा. आयुक्त यांचे दि. 25/03/2023 चे आदेशान्वये व या कार्यालयाचे पत्र क्रमांक- अ.म.न.पा./स.सं.न.र./अभि/ 922 /2023 दिनांक 29/03/2023 अधिल शर्ती व अटींनुसार रेखांकित अभिन्यास/भूखंड उपविभागणी मंजूर.

सहाय्यक संचालक नगर रचना महानगर पालिका अमरावती




**CERTIFICATE OF AREA :-**

*Certified that the plot under reference was surveyed by me on __/__/______ and the dimension of sides etc. of plots stated on plan are as measured on site and the area so worked out tallies with the area stated in document of ownership / T.P. Scheme records / Land records Department / City Survey records.*

Er. Ravindra J. Wankhade
B.E. (Civil) MIE (I)
CHARTERED ENGINEER
R. No.DDMCA/R/2022/APL/00557
(Architect / Engineer Sing )

OWNER'S SIGNATURE

1) Prem
2) Paresh
3) Mhscwal
4) Mahi

# तहसिलदार अमरावती यांचे न्यायालय

**रा.मा.क्र./एम.आर.सी-८१/शेगाव-५११ /२०२३-२४**

**अर्जदार:-** सृष्टी कमर्शियल्स तर्फे भागीदार सुदीप प्रदीपराव पेठे रा. अमरावती

**-आदेश-**

(पारीत दिनांक-८ / ३ /२०२४)

अर्जदार सृष्टी कमर्शियल्स तर्फे भागीदार सुदीप प्रदीपराव पेठे रा. अमरावती यांचे अर्जानुसार मौजा शेगाव ता.जि. अमरावती येथील सर्व्हे नं. १३/३/ब मधील प्लॉट नं. १ शेतजमीन रामाक्र./एन.ए.पी-३४/शेगाव/५०३/२०२२-२३,दि.२९.०३.२०२३ आदेशान्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषक झाली आहे.

या मधील प्लॉट क्र. १ चे क्षेत्र २६००.०० चौ.मी अर्जदार यांच्या खालील प्रमाणे अर्जदार यांच्या मालकीचे आहे.

उपरोक्त नमुद प्लॉट चे खालील प्रमाणे विभाजन करुन मिळणेबाबत विनंती अर्ज अर्जदार यांनी या कार्यालयास दाखल केला आहे.

| भुखंड क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|
| १/१ | ११०३.७३ चौ.मि. |
| १/२ | ७५२.६० चौ.मि. |
| १/३ | ७४३.६७ चौ.मि. |
| **एकुण क्षेत्रफळ** | **२६००.०० चौ.मि.** |

अर्जदार यांनी अर्जासोबत गाव नमुना ७/१२, आधारकार्ड, छाया प्रत, खरेद खत, अकृषक आदेश, तसचे सहायक संचालक नगर रचना महानगरपालीका अमरावती यांचे पत्र अमनपा/ससंनर/बां.प/हु.क्र.321,दि.15.02.2024 नुसार भुखंड विभाजन शिफारशी सह नकाशे मंजुरीबाबत पत्र प्रकरणात दाखल केले आहे.

प्रकरणात वर नमुद केलेल्या बाबीचा विचार करता सहायक संचालक नगर रचना महानगरपालीका अमरावती यांचे पत्र अमनपा/ससंनर/बां.प/हु.क्र.321,दि.15.02.2024 नुसार प्लॉटचे विभाजनाची शिफारस केलेली असल्याने त्याचे उक्त पत्रातील अटीस अधीन राहुन व अकृषक आदेशामधील इतर अटी व शर्ती कायम ठेवून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार सदर्हु प्रकरणात उपरोक्त नमुद प्लॉट क्र. १ चे विभाजन खालील अटीचे शर्तीच्या आधारे परवनगी देण्यात येत आहे. अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

Scanned with OKEN Scanner

तहसिलदार अमरावती

प्रतिलिपी:-

१) सहायक संचालक नगर रचना महानगर पालिका अमरावती यांना माहितीस रवाना.

२) उपअधिक्षकभुमी अभिलेख अमरावती यांना माहितीस रवाना.

३) मंडळ अधिकारी शेगाव/तलाठी शेगाव, ता.जि.अमरावती यांना उपरोक्त प्रमाणे नोंद करुन घ्यावी.

४) सृष्टी कमर्शियल्स तर्फे भागीदार सुदीप प्रदीपराव पेठे रा.अमरावती यांना माहितीस रवाना.

तहसिलदार अमरावती

Scanned with OKEN Scanner